22 JUL 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# क्रीडा विकासातून गावांचाही विकास शक्य

## तैवानमधील त्सिंघुआ राष्ट्रीय विद्यापीठाचे प्रा. ह्युअँग यू : क्रीडाविज्ञान कार्यशाळा उत्साहात

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवउद्योजकांनी खेळाकडे केवळ खेळ म्हणून न पाहता खेळाडूंना लागणारे साहित्य सुविधा पुरविण्यावर लक्ष केंद्रीत करावे. असे केल्यास क्रीडाक्षेत्रात नवउद्योजगांना भरारी घेता येईल, शिवाय त्यांच्याकडून नवनवीन रोजगारही मिळण्यास मदत होईल. या रोजगारांच्या जोरावर गावांचा विकासही होईल, असे प्रतिपादन तैवानमधील त्सिंघुआ राष्ट्रीय विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाचे अध्यक्ष प्रा. ह्युअँग यू यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये आयोजित 'क्रीडाविज्ञान' या विषयावरील कार्यशाळेच्या ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. प्रा. ह्युअँग यू व प्रा. लियू




कोल्हापूर : 'क्रीडाविज्ञान' कार्यशाळेत बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी प्रा. ह्युअँग यू, प्रा. लियू सियान, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. टी. गायकवाड.

सियान हे शिवाजी विद्यापीठाच्या भेटीसाठी आले होते. त्यांनी विद्यापीठाचा क्रीडा विभाग, सेंट झेविअर्स हायस्कूल, पोलो मैदान, मोतिबाग तालीम आणि आष्टा (जि. सांगली) येथील अण्णासाहेब डांगे इंजिनिअर कॉलेज आदीं ठिकाणी भेटी देऊन तेथील खेळ व सरावाची माहिती घेतली.

प्रा. ह्युअँग यू म्हणाले, जेथे-जेथे क्रीडा संस्कृतीची प्रगती होत गेली तेथे-तेथे लोकांचा आणि गावांचा विकास होत गेला आहे. वेगवेगळया शहरांमध्ये आयोजित केल्या गेलेल्या विविध खेळांच्या स्पर्धांमुळे तेथील स्थानिकांना, उद्योजकांना नवीन रोजगाराची संधी मिळाली. त्सिंघुआ राष्ट्रीय विद्यापीठाने ३३६.२ एकराच्या परिसरामध्ये विविध खेळांची मैदाने बनवली आहेत. या मैदानावर खेळल्या जाणाऱ्या खेळांमध्ये शिवाजी विद्यापीठाशी झालेल्या सामंजस्य कराराच्या माध्यमातून आमुलाग्र बदल केले जातील. विद्यापीठाच्या खेळाडूंनाही तैवानमधील खेळांच्या तंत्राचा चांगला उपयोग करुन घेता येईल.

प्रा. सियान लियू म्हणाले, शालेयस्तरावर विविध खेळांचा सराव करत असलेल्या विद्यार्थ्यांमधील कौशल्याकडे प्रशिक्षकांनी जाणीवपूर्वक लक्ष देण्याची गरज आहे. तसेच खेळाडू घडविण्यासाठी संबंधीत खेळातील नियम जाणून घेणे, आधुनिक पद्धतीचे सराव कौशल्ये आणि खेळाचे तंत्र आत्मसात करण्याकडे ही प्रशिक्षकांचा ओढा असला पाहिजे. अशी ओढ असलेले प्रशिक्षकच त्यांच्यातील कस ओळखून त्यांना उत्तम दर्जाचे खेळाडू बनवू शकतात. तसेच त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेसाठी लायक बनवू शकतात.

डॉ. देवानंद शिंदे म्हणाले, जागतिक पातळीवर शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंना मजल मारता यावी, तैवानमधील क्रीडातंत्र खेळाडूंना मिळावे, या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाने त्सिंगहुआ राष्ट्रीय विद्यापीठाशी सामंजस्य करार केला आहे. यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व आंतरराष्ट्रीय संबंध कक्षाचे समन्वयक डॉ. अनिल घुले उपस्थित होते. ६ डॉ. पी. टी. गायकवाड यांनी स्वागत केले. डॉ. टी. के. करिकट्टी यांनी सुत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 JUL 2018
तरूण भारत

# विद्यापीठात ग्रंथालयातर्फे बुधवारी कार्यशाळा

प्रतिनिधी

कोल्हापूर

बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्त्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग यांच्या ५५ व्या वर्षाचे औचित्य साधून इन्फ्लीबनेट सेंटर गांधीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने २४ ते २९ जूलै या कालावधीत कार्यशाळेचे आयोजन केले आहे.

'क्रिएशन ॲण्ड मॅनेजमेंट ऑफ आयआर युजींग डीस्पेस ओपन सोर्स सॉफ्टवेअर ॲन्ड लायब्ररी ॲटोमेशन युजिंग एसओयूएल २.०" हा कार्यशाळेचा विषय आहे. तरी जास्तीत जास्त शिक्षक, विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन ग्रंथपाल डॉ. नमिता खोत व डॉ. शालिनी लिहीतकर यांनी केले आहे.

या कार्यशाळेचे उद्‌घाटन गुलबर्गा विद्यापीठाचे प्रभारी ग्रंथपाल डॉ. सुरेश झांग शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यशाळेत इन्फ्लीबनेट सेंटर गांधीनगर येथील विषयतज्ज्ञ एच. जी. होसामनी, शास्त्रज्ञ स्वप्नील पटेल, शास्त्रज्ञ विजयकुमार श्रीमाली, वैज्ञानिक व तांत्रिक सहाय्यक इन्फ्लीबनेट सेंटर हे उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या एम. लिफ ॲन्ड एन्फर्मेशन सायन्स या पदव्युत्तर अभ्यासक्रमातील ८ विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व माजी विभागप्रमुखांचा सत्कार करण्यात येणार आहे.

# शिवाजी विद्यापीठात मंगळवारी कार्यशाळा

कोल्हापूर : बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्र आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग यांच्या ५५व्या वर्षाचे औचित्य साधून इन्फ्लीबनेट सेंटर गांधीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने २४ ते २९ जुलै या कालावधीत इन्स्टीट्युशनल रिपॉजेटरी डीस्पेस व सोल ग्रंथालय संगणकीकरण या विषयावर एका आठवड्याच्या राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन सर्व ग्रंथपालासाठी केलेले आहे.